# हवामानावर आधारीत विशेष कृषि सल्ला (कोकण विभाग)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**दिनांक ०४/०६/२०२०**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


## "निसर्ग" चक्रीवादळानंतरचा हवामान आधारित विशेष कृषि सल्ला

| पिके | कृषी सल्ला |
|---|---|
| **भात** | • पेरणी केलेल्या भात रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| | • भात रोपवाटिकेची पेरणी राहिली असल्यास जमीन वाफसा स्थितीत आल्यानंतर भात बियाण्यांची पेरणी करावी. |
| | • चक्रीवादळामुळे झालेल्या मुसळधार पाउसामुळे रोपवाटिका वाहून गेली असल्यास जमीन वाफसा स्थितीत आल्यानंतर पुन्हा पेरणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | • भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| | • जमीन वाफसा स्थितीत आल्यानंतर लगेचच वेलवर्गीय आणि इतर भाजीपाला पिकांची पेरणी करावी. |
| **फळबाग पिके** | • चक्रीवादळामुळे जी झाडे, झाडांच्या फांद्या मोडून पडलेल्या असतील ते स्वयंचलित करवतीच्या सहाय्याने तिरकस कापावीत आणि पाऊसाची तीव्रता कमी असताना कापलेल्या भागाला १ टक्के बोर्डो पेस्ट लावावीत. |
| | • काजू आणि आंबा झाडांच्या बाबतीत कापलेल्या फांद्यावर व खोडावर किडींचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून क्लोरपायरीफॉस २०% प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात द्रावण करून संपूर्ण झाडावर पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी. |
| | • सर्व फळबागांची साफसफाई करून गोळा होणाऱ्या काडीकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट करावी. |
| | • मुख्यत: आंबा बागांमध्ये वाऱ्याच्या वेगामुळे फळगळ झालेली फळे गोळा करून खोल जमिनीत गाडून द्यावीत जेणेकरून पुढील हंगामात फळमाशीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल. |
| | • चक्रीवादळामुळे नारळाच्या कोंबाला इजा झाली असल्यास कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. यासाठी कोंबामध्ये १ टक्का बोर्डोमिश्रणाची आळवणी करावी. |
| | • फळबाग आणि फळबाग रोपवाटिकेमधील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| | • नुकसानग्रस्त केळीबागेतील केळेबे जमिनीलगत कापून घ्यावेत. |
| | • चक्रीवादळामुळे पडझड झालेल्या झाडांना योग्य पध्दतीने आधार द्यावा. |